Regulation No. 06 /2023

आधुनिक व्यायामशाळा देखभालीबाबतचे विनियम

ज्याअर्थी रूसा तसेच विद्यापीठाचे निधीतुन उपलब्ध झालेल्या अर्थसहाय्यातुन विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येत असलेल्या आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ विविध क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाच्या उद्देशाने तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे शारीरिक सुदृढतेकरिता विद्यापीठाचे परिसरात आधुनिक व्यायाम शाळेची उभारणी करण्यात आली आहे.

आणि

ज्याअर्थी आधुनिक व्यायाम शाळेच्या संदर्भात देखभाल, उपयोग, सुरक्षा आदिबाबत विनियम तयार करणे अनिवार्य झाले आहे.

आणि

ज्याअर्थी आधुनिक व्यायामशाळा तसेच तेथे कार्यान्वित असलेल्या व्यायामाच्या उपकरणांची दैनंदिन देखभाल करणे, व्यायामशाळेचा परिसर स्वच्छ ठेवणे, आधुनिक व्यायामशाळा उपयोग कर्त्यांवर नियंत्रण ठेवणे, त्यांची माहिती ठेवणे, शुल्क आकारणी असल्यास शुल्क स्विकारणे, प्राप्त झालेले शुल्क दैनंदिन विद्यापीठ खाती जमा करणे, व्यायामशाळेच्या उपकरणांचा दैनंदिन रखरखाव ठेवणे, तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची पुर्व सूचना संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांना देणे, आदि बाबी करून घेणे अनिवार्य आहे.

त्याअर्थी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद खालील विनियम तयार करीत आहे.

१. या नियमांना विद्यापीठाच्या आधुनिक व्यायायमशाळेच्या देखभालीचे विनियम-२०२३ असे संबोधण्यात येईल.

२. सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केलेल्या दिनांकापासुन अंमलात येतील.

३. या नियमांमध्ये उल्लेख केल्या जाणाऱ्या शब्दांचे अर्थ खालीलप्रमाणे राहतील.

i. **विद्यापीठ म्हणजे** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कायदा १९८३ अन्वये गठीत विद्यापीठ

ii. **कुलसचिव म्हणजे** महाराष्ट्र विद्यापीठे कायदा-२०१६ मधील तरतुदीनुसार नियुक्त करण्यात आलेले कुलसचिव

iii. **आधुनिक व्यायामशाळा म्हणजे** आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ विविध क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाच्या उद्देशाने तसेच विद्यापीठात पदव्युत्तर शैक्षणिक विभाग़ात आणि संलग्नित महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांची शारीरिक सुदृढता राहावी याकरिता रूसा यांच्याद्वारे प्राप्त झालेल्या अनुदानातून व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे निधीतुन बांधण्यात आलेली आधुनिक व्यायामशाळा.

iv. **उपकरणे म्हणजे** आधुनिक व्यायाशाळेमध्ये स्थापित करण्यात आलेली उपकरणे.

v. **देखभाल व उपाययोजना म्हणजे** निर्धारित कालांतरामध्ये आधुनिक व्यायामशाळेची उपकरण पडताळणी करण्यासाठी केलेली उपाययोजना.

vi. **नियंत्रण अधिकारी म्हणजे** क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

vii. **सदस्य म्हणजे** आधुनिक व्यायाम शाळेचा उपयोग घेण्याकरिता नियमाने विहित केलेले सदस्यांकडून निर्धारित केलेले शुल्क भरून/निशुल्क सदस्यत्व प्राप्त करणाऱ्या व्यक्ती

viii. **प्रभारी म्हणजे** नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचारी/व्यक्तीकडून समाधानकारकरित्या कामे करण्यात आले किंवा नाही याबाबतची खात्री करणारा, व दरमहा प्राप्त झालेले देयक विहित कालावधीत शोधनाकरिता पाठविण्याकरिता क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांच्याद्वारे नियुक्त करण्यात आलेला/आलेले कर्मचारी.

४. आधुनिक व्यायाम शाळेत स्थापित करण्यात आलेली उपकरणे - नियंत्रण अधिकारी आधुनिक व्यायामशाळेमध्ये अस्तित्वात असलेल्या उपकरणांची यादी तयार करेल ज्याचा समावेश ज्या उपकरणांचा रखरखाव करण्याच्यादृष्टीने उपयुक्त राहील. सदर यादीमध्ये उपकरणाचे नांव, नंबर, तपशिल, या उपकरणांना अनुक्रमांक प्रदान केला असल्यास अनुक्रमांक, खरेदीची तारीख, उपकरणांची किंमत, आश्वस्ती कालावधी (Warranty Period) आदि बाबींचा समावेश राहील.

५. दैनंदिन/मासिक देखभाल - दैनंदिन/मासिक देखभाल नियंत्रण अधिकारी प्रभारी व्यक्तीच्या सहाय्याने करेल.

६. आर्थिक तरतुद - दैनिक/मासिक देखभाल करण्याकरिता वार्षिक अंदाजपत्रकात आर्थिक तरतुद करण्याची कार्यवाही नियंत्रण अधिकाऱ्यांच्या मार्फत प्रती वर्षी केली जाईल.

७. **मेन्टेनंन्स कार्ड** - प्रभारी व्यक्तीला विहित करण्यात आलेल्या नमुन्यानुसार मेन्टेनन्स कार्डचा उपयोग करावा लागेल. मेन्टेनंन्स कार्ड विद्यापीठाच्या प्रशासकीय कार्यालयात सहज उपलब्ध होतील अशा पद्धतीने प्रभारी व्यक्तीला ठेवावे लागतील.

८. **तक्रार नोंदवही** - प्रभारी व्यक्तीला आधुनिक व्यायामशाळेममध्ये तक्रार नोंदवही ठेवावी लागेल. ज्यामध्ये संयत्र व उपकरणे या संबंधीच्या तक्रारीची नोंद घेतली जाईल ज्यावर त्यास नियंत्रण अधिकाऱ्यांची स्वाक्षरी प्राप्त करावी लागेल.

९. **रखरखावाचे प्रमाणिकरण** - प्रभारी व्यक्तीद्वारे करण्यात आलेल्या रखरखावाचे प्रमाणिकरण नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करेल.

१०. **रखरखावाचा अहवाल** - प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेला प्रभारी व्यक्तीला रखरखावाचा अहवाल नियंत्रण अधिकाऱ्यास सादर करावा लागेल.

११. **संयंत्रांमध्ये अथवा उपकरणांमध्ये बिघाड** - संयंत्रांमध्ये अथवा उपकरणांमध्ये बिघाड झाल्यानंतर बदलविण्यात आलेले सुटे भाग प्रभारी व्यक्ती नियंत्रण अधिकाऱ्यांकडे तपासणी व खात्रीकरिता जमा करेल. बिघाड झालेले सुटे भाग समान लेखा संहितेतील तरतुदीनुसार अपलेखित करण्याची कार्यवाही केली जाईल.

१२. **जिवित अथवा वित्त हानी** - आधुनिक व्यायाम शाळेचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीची जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१३. **उपकरणांचा रखरखाव**- प्रभारी व्यक्तीस आधुनिक व्यायामशाळा व तेथील उपकरणे व्यायाम करण्यायोग्य व सुयोग्य पद्धतीने ठेवावे लागतील.

१४. **नेमण्यात येणाऱ्या व्यक्तीचे मासिक शोधन** - आधुनिक व्यायाम शाळेचा रखरखाव करण्याकरिता नेमण्यात येणाऱ्या व्यक्तीचे मासिक शोधन व्यवस्थापन परिषदने मान्य केलेल्या दरानुसार करण्यात येईल.

१५. **नेमण्यात येणारा व्यक्ती त्याची उपस्थिती नोंद**- आधुनिक व्यायामशाळेकरिता नेमण्यात येणारा व्यक्ती त्याची उपस्थिती, कार्यपद्धती यावर नियंत्रण अधिकाऱ्यांचे नियंत्रण राहील.

१६. प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात यासंदर्भातील वार्षिक अहवाल कुलसचिव व मा.कुलगुरू यांना विचारार्थ सादर करण्यात यावा.

स्वा/-

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

Regulation No. 07 /2023

आधुनिक व्यायामशाळेचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे विनियम-२०२३

ज्याअर्थी विद्यापीठाच्या आधुनिक व्यायाम शाळेकरिता कोणतेही संवैधानिक दस्त उपलब्ध नसल्याने त्याचा उपयोग, रखरखाव आणि नियंत्रण ठेवण्याकरिता विनियमांची आवश्यकता आहे.

आणि

ज्याअर्थी आधुनिक व्यायामशाळेची उपयोगिता करण्याकरिता सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे विनियम अस्तित्वात असणे गरजेचे आहे.

त्याअर्थी व्यवस्थापन परिषद खालीलप्रमाणे विविनियम लागू करीत आहे.

१. या नियमांना **"विद्यापीठाच्या आधुनिक व्यायामशाळेचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे विनियम-२०२३"** असे संबोधण्यात येईल.

२. सदर विनियम व्यवस्थापन परिषदेच्या सभेने मान्यता प्रदान केलेल्या दिनांकापासुन लागु होतील.

३. या विनियमामध्ये उपयोगात आणल्या जाणाऱ्या शब्दांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

i) **विद्यापीठ म्हणजे** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कायदा-१९८३ अन्वये स्थापीत झालेले विद्यापीठ

ii) **नियंत्रण अधिकारी म्हणजे** संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती किंवा त्या पदावर कार्यरत असलेला प्रभारी अधिकारी.

iii) **प्रभारी म्हणजे** आधुनिक व्यायामशाळेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्या आवेदकाने वित्त विभागात शुल्क जमा केल्यानंतर शुल्काच्या पावतीचे व आवेदन पत्राचे संकलन करणारा, सर्व शुल्कांची नोंदणी करणारा, शुल्काचे पावतीसह आवेदनपत्र स्विकारणारा, परिपुर्ण आवेदन पत्र प्राप्त झाल्यानंतर नियंत्रण अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने सदस्यांना पासेस देणारा, जलतरण तलावाचा दैनिक रखरखाव नियंत्रित करणारा व्यक्ती.

iv) **सदस्य म्हणजे** विनियमाने विहित केलेले आधुनिक व्यायामशाळेचे शुल्क भरून सदस्यत्व प्राप्त करून आधुनिक व्यायाम शाळेचा लाभ घेण्याऱ्या व्यक्ती.

विनियम --

१) **(a) सदस्यत्व शुल्क** - आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यत्व शुल्कात आवश्यकतेनुसार वेळोवेळी खालील तक्त्यात दर्शविलेल्या रकान्यात मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार वाढ करण्यात येईल व आधुनिक व्यायाम शाळेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींकडून खालील शुल्क आकारण्यात येईल.

अ.क्र.	सदस्यत्वाचा प्रकार	संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यापीठ पद्व्युत्तर विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठ आस्थापनेतील कायम कर्मचारी आणि विविध प्रधिकारणी/मंडळ सदस्य यांच्याकरिता सन २०२३ या वर्षापासुन लागु असलेले दर	सर्व सामान्य सदस्यांकरिता सन २०२३ या वर्षापासुन लागु असलेले दर
अ)	मासिक शुल्क	रूपये २००=००	रूपये ८००=००
ब)	त्रैमासिक शुल्क	रूपये ५००=००	रूपये २५००=००
क)	अर्धवार्षिक शुल्क	रूपये १०००=००	रूपये ५०००=००
ड)	वार्षिक शुल्क	रूपये २०००=००	रूपये १००००=००

(b) नोंदणी शुल्क - उपरोक्त शुल्काशिवाय सदस्य होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस नोंदणी शुल्क म्हणुन वार्षिक रूपये १००/- इतके शुल्क प्रतीवर्षी आकारले जाईल.

२) **व्यायामाचे ज्ञान** - आधुनिक व्यायामशाळेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यास साधारण व्यायामाचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

३) सदस्यत्वाकरिता नोंदणी शुल्काव्यतिरिक्त उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क हे सदस्य शुल्क म्हणुन भरावे लागेल.

४) **शुल्क परतावा** - आधुनिक व्यायामशाळा कोणत्याही कारणास्तव बंद ठेवण्यात आल्यास त्या कालावधीतील शुल्क कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही.

५) **आधुनिक व्यायामशाळेचा काळावधी** - आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग घेण्यासाठी आधुनिक व्यायामशाळा सकाळी ६.०० ते १०.०० व दुपारी ४.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत सर्व सदस्यांकरिता उघडी ठेवण्यात येईल. प्रत्येक सदस्यास व्यायामाकरिता ४५ मिनीटांचा कालावधी त्यांने आवेदनपत्रात नमुद केलेल्या वेळेमध्ये व २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, ०१ मे, होळी आणि धुलीवंदन हे दिवस वगळता उपलब्ध करून दिला जाईल. एकदा आवेदनपत्रात जी वेळ नमुद केलेली आहे त्या वेळेव्यतिरिक्त सदस्यांना इतर वेळेमध्ये व्यायामास अनुमती दिल्या जाणार नाही. तसेच निर्धारित वेळेपुर्वी आधुनिक व्यायाम शाळेच्या प्रवेशद्वाराचे आत सदस्यांना सोडण्यात येणार नाही.

६) **प्रथमोपचार** - प्रथमोपचाराव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची विशेष वैद्यकीय व्यवस्था विद्यापीठाकडून सदस्यास उपलब्ध करून दिल्या जाणार नाही.

७) **विहित ओळखपत्र** - प्रत्येक सदस्यांने आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग घेण्याकरिता विद्यापीठाने त्यांना प्रदान केलेले विहित ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील व त्याशिवाय त्यास प्रवेश दिला जाणार नाही. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ किंवा त्यांनी नामित केलेला व्यक्ती कोणत्याही क्षणी सदस्यांची ओळख तपासण्याकरिता आल्यास ओळखपत्राची मागणी करू शकेल.

८) **पासपोर्ट साईजचे छायाचित्र** - आवेदकास अर्ज सादर करते वेळी सादर केलेल्या अर्जानुसार ०२ पासपोर्ट साईजचे छायाचित्र आवेदनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

९) आगाऊ स्वरूपात भरलेली कोणतीही रक्कम कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

१०) **त्वचारोग अथवा संसर्गजन्य रोग** - आधुनिक व्यायामशाळेचा लाभ घेत असतांना सदस्याला कुठलाही त्वचारोग अथवा संसर्गजन्या रोग असल्यास त्याला व्यायामशाळेमध्ये प्रवेश देणे अथवा नाकारणे याचे अधिकारी प्रभारी अथवा संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांना राहील.

११) **व्यायाम पेहराव-** सदस्याने व्यायामशाळेचा उपयोग घेत असतांना स्वच्छ नॅपकीन नियमित स्वरूपात आणणे, जिम शुज, ट्रॅकसुट लोअर आणि टि-शर्ट यांचा वापर करणे अनिवार्य राहील. सँडो बनियन अथवा उघड्या अंगाने सदस्यांना व्यायामाच्या उपकरणांचा उपयोग करता येणार नाही.

१२) **विहित नमुन्यातील अर्ज** - आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यत्वासाठी विहित नमुन्यातील अर्ज सविस्तर भरून कार्यालयास सादर करतांना अर्जासोबत सदस्यांच्या त्वचेचे आजार, शरीरावर जखम, घाव, फोड, फुटकळी, संसर्ग आजार, डोळ्याचा संसर्गजन्य रोग नसल्याबाबतचे तसेच दमा, मिरगी, हृदयरोग असे आजार नसल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. यापैकी कोणताही आजार असल्यास सदस्यास प्रवेश दिल्या जाणार नाही.

१३) **सदस्यत्वाची मुदतवाढ** - सदस्यत्वाची मुदतवाढ घेण्याकरिता सदस्यास प्रत्येक वेळी वैद्यकीय प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे.

१४) **अनुशासन** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये दुसऱ्यास अधिक वजन उचलण्यास फाजील प्रोत्साहित करणे, कुठल्याही बंदी असलेल्या वैद्यकीय औषधांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास त्याचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल व याबाबत कुठली सबब ऐकून घेण्यात येणार नाही.

१५) **केशभूषा** - लाब केस ठेवणाऱ्या महिला व पुरूष सदस्यांनी व्यायाम करतांना उपयुक्त अशी टोपी (Cap) परिधान करणे अनिवार्य आहे.

१६) **पादत्राणांचा वापर** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये पादत्राणे घालून वावरण्यास सक्त मनाई आहे.

१७) **परिक्षेत्रात धुम्रपान, मद्यपान** - विद्यापीठ परिक्षेत्रात धुम्रपानास, मद्यपानास व वेगाने वाहन चालविण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास संबंधितांचे सदस्यत्व कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द केले जाईल व त्याबद्दल भरलेल्या शुल्काचा परतावा कोणत्याही सबबीवर परत केला जाणार नाही.

१८) **कर्तव्ये** - आधुनिक व्यायामशाळा परिक्षेत्रातील व विद्यापीठाचे बागेतील झाडे, रोपे, फुलझाडे इत्यादींना हात लावणे, इजा पोचविणे व फुले तोडणे सक्त मनाईचे आहे.

१९) **वर्ज्य प्रवेश स्थाने** - आधुनिक व्यायामशाळेच्या कार्यालयीन कक्षामध्ये किंवा उद्घोषण कक्ष (Announcing Booth) इत्यादी ठिकाणी सदस्यांना प्रवेश वर्जित आहे.

२०) **प्रमाणित पोषाख** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये व्यायामाकरिता असलेला प्रमाणित पोषाख सदस्यांना स्वखर्चाने आणावा लागेल.

२१) **प्रवेश अनुमती** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणालाही व्यायाम करण्यास परवानगी दिल्या जाणार नाही.

२२) **ओळखपत्र** - आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग घेतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

२३) **मौल्यवान वस्तु** - व्यायामासाठी येतांना किंमती वस्तु, सोन्या-चांदीचे दागीने, घड्याळ, मोबाईल इत्यादी वस्तु आणु नये. आणल्यास त्या वस्तु सुरक्षित सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित सदस्यांची राहील व गहाळ झाल्यास विद्यापीठ त्यांचे कर्मचारी जबाबदार राहणार नाही.

२४) **अधिक माहिती** - आधुनिक व्यायामशाळेसंबंधी अधिक उपयुक्त अशा माहितीकरिता संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

२५) **सहकार्य** - व्यायामशाळा स्वच्छ व व्यायामायोग्य ठेवण्यास प्रत्येक सदस्यांनी योग्य ते सहकार्य करणे गरजेचे राहील.

२६) **व्यायामशाळेचा उपयोग** - आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ विविध क्रीडा स्पर्धाकरिता अथवा कुठल्याही तांत्रिक, नैसर्गिक कारणास्तव व्यायामशाळा बंद ठेवण्याची आवश्यकता भासल्यास व्यायामशाळा बंद ठेवण्याचे सर्वाधिकार विद्यापीठाकडे राखीव राहतील. अशा परिस्थितीत व्यायामशाळा ज्या कालावधीकरिता बंद ठेवण्यात येईल त्याचे शुल्क सदस्यास परत केले जाणार नाही अथवा तितक्या दिवसाचा कालावधी पुढे वाढवून दिला जाणार नाही.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

कृपया
छायाचित्र येथे
चिकटवावे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
आधुनिक व्यायामशाळा सदस्यता आवेदन पत्र

प्रति,
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती
महोदय,

मी खालील सही करणार, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आधुनिक व्यायामशाळेचा सदस्य होऊ इच्छीत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यत्वाबाबतचे सर्व विनियम मी वाचलेले असुन ते मला मान्य आहेत आणि त्याचे मी पालन करीन. करीता मी माझे हे **आवेदन पत्र माझ्या निवासी पत्त्याचा अधिकृत पुरावा व आरोग्य प्रमाणपत्रासह** सादर करित असुन माझ्या आवेदनपत्राचा स्विकार करावा व मला आधुनिक व्यायामशाळेचे सदस्यत्व या आवेदन पत्राचे मागील पानावर मुद्रीत विनियमातील तरतुदीचे अधिन राहून माझ्या स्वतःचे जबाबदारीवर देण्यात यावे, ही विनंती.

मी आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग ४५ (पंचेचाळीस) मिनीटाचे कालावधीपेक्षा जास्त नाही इतक्या वेळेसाठी सकाळी/संध्याकाळी _____ वाजता पासुन _____ वाजे पर्यंत करण्यास इच्छुक आहे.

१. संपुर्ण नांव : _____

२. जन्म तारीख : _____

३. वय वर्षे : _____

४. यापुर्वी आधुनिक व्यायामशाळेचे सदस्य होते काय ? **होय** / **नाही**

५. पुर्वीच्या सदस्यत्वाचा नोंदणी क्रमांक _____ *(पासवर नमुद असलेला)*

६. आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यत्वाचा प्रकार
(✓ अशी खुण करावी) **मासिक** **त्रैमासिक** **अर्धवार्षिक** **वार्षिक**

७. यापुर्वीच्या सदस्यत्वाचा कालावधी दिनांक _____ पासुन _____ पर्यंत

८. **संपुर्ण पत्ता :** निवासी पत्त्याचा पुरावा दर्शविणाऱ्या अधिकृत पुराव्याची सत्यप्रत जोडावी.

_____ आवेदकांची स्वाक्षरी
_____ दूरध्वनी क्र. _____
_____ भ्रमणध्वनी क्र. _____

(आवेदन पत्रासोबत निवासी पत्त्याचा पुरावा स्वतंत्ररित्या जोडणे अनिवार्य आहे.)

आरोग्य प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/कुमारी _____ यांची वैद्यकीय तपासणी केलेली असुन ते आधुनिक व्यायाम शाळेचे सदस्यत्व प्राप्त होण्याच्यादृष्टीने ते संसर्गजन्य रोग, चर्म रोगापासुन मुक्त असुन शारीरिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत.

दिनांक : _____ वैद्यकीय अधिकाऱ्यांची स्वाक्षरी : _____
शिक्का

- सत्यापन -

मी _____ सत्यापन सादर करतो की, माझ्याकडून वरीलप्रमाणे नमुद केलेली माहिती पुर्णतः खरी असुन सदर माहिती खोटी अथवा बनावट स्वरूपाची आढळून आल्यास माझ्यावर कायदेशिर कार्यवाही करण्याकरिता विद्यापीठास पुर्ण अधिकार राहील व अशा परिस्थितीत माझ्या जिवीत अथवा वित्त हानीस विद्यापीठ अथवा नियुक्त केलेला प्रभारी/विद्यापीठ कर्मचारी तसेच अन्य कर्मचारी जबाबदार राहणार नाही. खोट्या व बनावट माहितीचे कारणास्तव माझे सदस्यत्व रद्द करण्याचे तसेच माझ्याकडून विद्यापीठ खाती जमा केलेले शुल्क मला परत न करण्याचे पुर्ण अधिकार विद्यापीठास राहील व त्याबाबत माझी कुठलीही हरकत राहणार नाही.

दिनांक : _____ सदस्याची स्वाक्षरी : _____
सदस्याचे पुर्ण नांव : _____

आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यांकरिता विनियम

अ.क्र.	सदस्यत्वाचा प्रकार	संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यापीठ पद्व्युत्तर विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठ आस्थापनेतील कायम कर्मचारी आणि विविध प्रधिकारणी/मंडळ सदस्य यांच्याकरिता सन २०२३ या वर्षापासुन लागु असलेले दर	सर्व सामान्य सदस्यांकरिता सन २०२३ या वर्षापासुन लागु असलेले दर
अ)	मासिक शुल्क	रूपये २००=००	रूपये ८००=००
ब)	त्रैमासिक शुल्क	रूपये ५००=००	रूपये २५००=००
क)	अर्धवार्षिक शुल्क	रूपये १०००=००	रूपये ५०००=००
ड)	वार्षिक शुल्क	रूपये २०००=००	रूपये १००००=००

१) **व्यायामाचे ज्ञान** - आधुनिक व्यायामशाळेचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यास साधारण व्यायामाचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

२) सदस्यत्वाकरिता नोंदणी शुल्काव्यतिरिक्त उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क हे सदस्य शुल्क म्हणुन भरावे लागेल.

३) **शुल्क परतावा** - आधुनिक व्यायामशाळा कोणत्याही कारणास्तव बंद ठेवण्यात आल्यास त्या कालावधीतील शुल्क कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही.

४) **आधुनिक व्यायामशाळेचा काळावधी** - आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग घेण्यासाठी आधुनिक व्यायामशाळा सकाळी ६.०० ते १०.०० व दुपारी ४.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत सर्व सदस्यांकरिता उघडी ठेवण्यात येईल. प्रत्येक सदस्यास व्यायामाकरिता ४५ मिनीटांचा कालावधी त्यांने आवेदनपत्रात नमुद केलेल्या वेळेमध्ये व २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, ०१ मे, होळी आणि धुलीवंदन हे दिवस वगळता उपलब्ध करून दिला जाईल. एकदा आवेदनपत्रात जी वेळ नमुद केलेली आहे त्या वेळेव्यतिरिक्त सदस्यांना इतर वेळेमध्ये व्यायामास अनुमती दिल्या जाणार नाही. तसेच निर्धारित वेळेपुर्वी आधुनिक व्यायाम शाळेच्या प्रवेशद्वाराचे आत सदस्यांना सोडण्यात येणार नाही.

५) **प्रथमोपचार** - प्रथमोपचाराव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची विशेष वैद्यकीय व्यवस्था विद्यापीठाकडून सदस्यास उपलब्ध करून दिल्या जाणार नाही.

६) **विहित ओळखपत्र** - प्रत्येक सदस्यांने आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग घेण्याकरिता विद्यापीठाने त्यांना प्रदान केलेले विहित ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील व त्याशिवाय त्यास प्रवेश दिला जाणार नाही. संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ किंवा त्यांनी नामित केलेला व्यक्ती कोणत्याही क्षणी सदस्यांची ओळख तपासण्याकरिता आल्यास ओळखपत्राची मागणी करू शकेल.

७) **पासपोर्ट साईजचे छायाचित्र** - आवेदकास अर्ज सादर करते वेळी सादर केलेल्या अर्जानुसार ०२ पासपोर्ट साईजचे छायाचित्र आवेदनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

८) आगाऊ स्वरूपात भरलेली कोणतीही रक्कम कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

९) **त्वचारोग अथवा संसर्गजन्य रोग** - आधुनिक व्यायामशाळेचा लाभ घेत असतांना सदस्याला कुठलाही त्वचारोग अथवा संसर्गजन्या रोग असल्यास त्याला व्यायामशाळेमध्ये प्रवेश देणे अथवा नाकारणे याचे अधिकारी प्रभारी अथवा संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांना राहील.

१०) **व्यायाम पेहराव**- सदस्याने व्यायामशाळेचा उपयोग घेत असतांना स्वच्छ नॅपकीन नियमित स्वरूपात आणणे, जिम शुज, ट्रॅकसुट लोअर आणि टि-शर्ट यांचा वापर करणे अनिवार्य राहील. सँडो बनियन अथवा उघड्या अंगाने सदस्यांना व्यायामाच्या उपकरणांचा उपयोग करता येणार नाही.

११) **विहित नमुन्यातील अर्ज** - आधुनिक व्यायामशाळेच्या सदस्यत्वासाठी विहित नमुन्यातील अर्ज सविस्तर भरून कार्यालयास सादर करतांना अर्जासोबत सदस्यांच्या त्वचेचे आजार, शरीरावर जखम, घाव, फोड, फुटकळी, संसर्ग आजार, डोळ्याचा संसर्गजन्य रोग नसल्याबाबतचे तसेच दमा, मिरगी, हृदयरोग असे आजार नसल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. यापैकी कोणताही आजार असल्यास सदस्यास प्रवेश दिल्या जाणार नाही.

१२) **सदस्यत्वाची मुदतवाढ** - सदस्यत्वाची मुदतवाढ घेण्याकरिता सदस्यास प्रत्येक वेळी वैद्यकीय प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे.

१३) **अनुशासन** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये दुसऱ्यास अधिक वजन उचलण्यास फाजील प्रोत्साहित करणे, कुठल्याही बंदी असलेल्या वैद्यकीय औषधांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास त्याचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल व याबाबत कुठली सबब ऐकून घेण्यात येणार नाही.

१४) **केशभूषा** - लाब केस ठेवणाऱ्या महिला व पुरूष सदस्यांनी व्यायाम करतांना उपयुक्त अशी टोपी (Cap) परिधान करणे अनिवार्य आहे.

१५) **पादत्राणांचा वापर** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये पादत्राणे घालून वावरण्यास सक्त मनाई आहे.

१६) **परिक्षेत्रात धुम्रपान, मद्यपान** - विद्यापीठ परिक्षेत्रात धुम्रपानास, मद्यपानास व वेगाने वाहन चालविण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास संबंधितांचे सदस्यत्व कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द केले जाईल व त्याबद्दल भरलेल्या शुल्काचा परतावा कोणत्याही सबबीवर परत केला जाणार नाही.

१७) **कर्तव्ये** - आधुनिक व्यायामशाळा परिक्षेत्रातील व विद्यापीठाचे बागेतील झाडे, रोपे, फुलझाडे इत्यादींना हात लावणे, इजा पोचविणे व फुले तोडणे सक्त मनाईचे आहे.

१८) **वर्ज्य प्रवेश स्थाने** - आधुनिक व्यायामशाळेच्या कार्यालयीन कक्षामध्ये किंवा उद्घोषण कक्ष (Announcing Booth) इत्यादी ठिकाणी सदस्यांना प्रवेश वर्जित आहे.

१९) **प्रमाणित पोषाख** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये व्यायामाकरिता असलेला प्रमाणित पोषाख सदस्यांना स्वखर्चाने आणावा लागेल.

२०) **प्रवेश अनुमती** - आधुनिक व्यायामशाळेमध्ये सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणालाही व्यायाम करण्यास परवानगी दिल्या जाणार नाही.

२१) **ओळखपत्र** - आधुनिक व्यायामशाळेचा उपयोग घेतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

२२) **मौल्यवान वस्तु** - व्यायामासाठी येतांना किंमती वस्तु, सोन्या-चांदीचे दागीने, घड्याळ, मोबाईल इत्यादी वस्तु आणु नये. आणल्यास त्या वस्तु सुरक्षित सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित सदस्यांची राहील व गहाळ झाल्यास विद्यापीठ त्यांचे कर्मचारी जबाबदार राहणार नाही.

२३) **अधिक माहिती** - आधुनिक व्यायामशाळेसंबंधी अधिक उपयुक्त अशा माहितीकरिता संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

२४) **सहकार्य** - व्यायामशाळा स्वच्छ व व्यायामायोग्य ठेवण्यास प्रत्येक सदस्यांनी योग्य ते सहकार्य करणे गरजेचे राहील.

२५) **व्यायामशाळेचा उपयोग** - आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ विविध क्रीडा स्पर्धाकरिता अथवा कुठल्याही तांत्रिक, नैसर्गिक कारणास्तव व्यायामशाळा बंद ठेवण्याची आवश्यकता भासल्यास व्यायामशाळा बंद ठेवण्याचे सर्वाधिकार विद्यापीठाकडे राखीव राहतील. अशा परिस्थितीत व्यायामशाळा ज्या कालावधीकरिता बंद ठेवण्यात येईल त्याचे शुल्क सदस्यास परत केले जाणार नाही अथवा तितक्या दिवसाचा कालावधी पुढे वाढवून दिला जाणार नाही.

वरील सर्व नियमांचे मी वाचन केले असुन ते मला/माझ्या मुलास/मुलीस/पाल्यास बंधनकारक असुन त्याचे आम्ही पालन करेल. मी नियमाचे उल्लंघन केल्यास माझे सदस्यत्व रद्द करण्यात यावे व मी जमा केलेले शुल्क मला कुठल्याही सबबीवर परत मिळणार नाही याची मला जाणिव आहे.

आवेदकाची स्वाक्षरी ----------

नांव : ----------